# मनाचं विज्ञान

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. ०९–०९–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

हजारो वर्षं 'अध्यात्म शास्त्र' असा शब्द प्रयोग प्रचलित असताना या ठिकाणी 'अध्यात्म–विज्ञान' या शीर्षकाखाली सदर का सुरू केलं? असा प्रश्न मनात येणं स्वाभाविकच आहे. दुसरं म्हणजे अध्यात्म आणि भौतिक विज्ञानाचा बादरायण संबंध लावला असावा असं वाटणंही शक्य आहे. कारण अशा प्रकारची विधानं अनेकदा प्रसृत झाली आहेत. खरं तर प्रत्येक शास्त्र हे विज्ञानावरच आधारित असतं. शास्त्र हा विज्ञानाचा परिपाक असतो. शास्त्रात सांगितलं आहे म्हणून त्याचं अनुसरण करणं हे केवळ अंधानुकरणच ठरेल. 'अध्यात्म' या विषयावर अथक पस्तीस वर्षं संशोधन केल्यानंतर माझ्या असं लक्षात आलं की 'अध्यात्म हे मनाचं परिपूर्ण विज्ञान आहे.' भौतिक –विज्ञान हे स्थूलाशी निगडित आहे. तर अध्यात्म–विज्ञान हे सूक्ष्म अशा मनाशी निगडित आहे. भौतिक–विज्ञान आणि अध्यात्म–विज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्या विभक्त होऊच शकत नाहीत.

भौतिक–विज्ञान विकसित होऊ लागलं तेव्हापासून 'विज्ञान' हा शब्द प्रचलित झाला, असा फार मोठा भ्रम समाजात आहे. वास्तविक हजारो वर्षांपूर्वी अथर्वशीर्ष लिहिलं गेलं आहे. त्यात आदिगणेशाला 'त्वं ज्ञानमयोविज्ञानमयो ऽसि' असं म्हटलं आहे. याचा अर्थ 'तू ज्ञानमय आहेस आणि विज्ञानमयही आहेस' असा होतो. एवढं कशाला? हिंदू तत्त्वज्ञानाचा आधारभूत मानला जाणारा आणि साधारण चार ते पाच हजार वर्षांपूर्वी लिहिला गेलेला 'भगवद्गीता' हा ग्रंथच घ्याना. या ग्रंथातील संपूर्ण सातवा अध्यायच 'ज्ञानविज्ञान योग' या शीर्षकाखाली लिहिला गेला आहे.

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषत: ।
यज्ज्ञात्वानेहभूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ।।भ . गी.७/२

याचा अर्थ – 'मी तुला विज्ञानासह हे ज्ञान सांगतो. जे जाणल्यावर इहलोकी इतर आणखी जाणायचे काहीच शेष रहात नाही' याचाच अर्थ कोणतंही ज्ञान हे त्यामागील विज्ञान ज्ञात झाल्यावरच पुर्णत्त्वाला पोहोचतं. म्हणूनच अध्यात्माचं विज्ञान जाणून घेतल्यावरंच, अध्यात्माचं ज्ञान पूर्णत्त्वाला पोचेल. आणि तोच या सदराचा हेतू आहे.